वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. २० फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३




# धनंजय मुंडेंच्या वरदहस्ताने कृषी खात्यात
# ३०० कोटींचा घोटाळा-आ.सुरेश धस

बीड, (दिव्य न्युज):- राज्याचे कॅबिनेटमंत्री धनंजय मुंडेंवर कृषी विभागातील घोटाळ्यांचे गंभीर आरोप करत तब्बल ३०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. आजारी असल्याने मंत्री धनंजय मुंडेंची भेट घेतल्यामुळे टीकेचे धनी झालेल्या आमदार सुरेश धस यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन वाल्मिक कराड आणि मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले आहेत. धनंजय मुंडेंच्या वरदहस्ताने कृषी खात्यात ३०० कोटींचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप केले आहेत. शेतकऱ्यांची तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांची कोणतीही मागणी नसताना खरेदी करण्याचा निर्णय घेतला. एकाच दिवशी प्रस्ताव पाठवला आणि त्याच दिवशी जीआर निघाला. हे सर्व डीबीटीने द्यावे असे तत्कालीन सनदी अधिकारी प्रवीण गेडाम यांनी सूचवले होते. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उपसचिव संतोष कराड यांनी नॅनो युरिया, नॅनो डीएपी आणि गोगलगाय प्रादुर्भाव रोखण्यासाठी अग्रिम देण्यात यावा असे आदेश काढल्याची माहिती आमदार धस यांनी दिली. तर, कृषी विभागातील बदल्यांसाठी तब्बल १०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचाही दावा करत त्यांनी चक्क रेटकार्डच जारी केलं आहे. त्यामध्ये, कोणत्या अधिकाऱ्याकडून बदलीसाठी किती रक्कम घेतली जाते, व त्यातील किती रक्कम धनंजय मुंडेंना मिळते हेही त्यांनी दाखवलं आहे.

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com


# दिव्य वार्ता

कश्मकश दिव्य वार्ता वर्धापन सोहळा दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे.












# बीडमध्ये ऐतिहासिक शिवजयंती साजरी

## सांस्कृतिक कार्यक्रम, साहसी खेळांची बीडकरांना मेजवानी









### शाओलीन मार्शल आर्ट ने अंगावर उमटले शहारे, मैदानावर झगमगाट

जिल्ह्यात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकारांनी हजेरी लावली. 'तिबेटियन मॉक' अर्थात तिबेट देशातील धर्मगुरूंचे जगप्रसिद्ध असलेले 'शाओलीन मार्शल आर्ट' सादर करण्यात आली.आगीचे लोळ अन् इतर चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर झाल्याने उपस्थितांच्या अंगावर शहारे आले.

छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर विविध कार्यक्रम झाले. यातच आंतरराष्ट्रीय दर्जाचा लाइट आणि लेझर शो देखील होता. वेगवेगळे चित्र लाईटच्या माध्यमातून दाखविण्यात आले. त्यामुळे मैदानावर झगमगाट होता.







बीडमध्ये आयोजित शिवजयंती कार्यक्रमाचे नियोजन करणारे शिवकालीन युध्दकला क्रिडाप्रशिक्षक विनोद साळोखे यांनी चांगल्या पध्दतीने नियोजन करून शिवजयंतीमध्ये योग्य नियोजन केल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांच्या वतीने सत्यांचा सत्कार करण्यात आला.

बीड, (दिव्य न्युज):- दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या माध्यमातून, आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली डीजेमुक्त आणि वर्गणीमुक्त सांस्कृतिक शिवजयंती सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीडकरांना विविध कला-क्रीडा सादरीकरणाच्या माध्यमातून अनोखी मेजवानी मिळाली.सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहक्ष यांच्या आयोजनातून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर बुधवारी (दि.१९) रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लाखो शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुक्त आनंद घेतला. आ.संदीप क्षीरसागरांनीही ढोल-ताशांच्या आणि शिवगीतांवर ठेका धरला होता. हे पाहून तरुणाई भारावली होती. या कार्यक्रमास बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, लाखो शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.







# जिल्ह्यातील ६२० अंगणवाडीताईंच्या हाताला मिळणार रोजगार



## अशा भरल्या जाणार जागा

बीड जिल्ह्यात अंगणवाडी सेविकेच्या १३६ तर मदतनिसच्या ४८४ अशा एकूण ६२० जागा रिक्त आहेत. यामध्ये बीड एकमध्ये अंगणवाडी सेविका १०, बौड दोनमध्ये अंगणवाडी सेविका १२, मदतनिस ५०, पाटोदा अंगणवाडी सेविका ५, मदतनिस सहा, शिरूर कासार अंगणवाडी सेविका १४, मदतनिस ७, गेवराई एक अंगणवाडी सेविका ५. मदतनिस ९, गेवराई दोन अंगणवाडी सेविका १३, मदतनिस ३१, माजलगाव अंगणवाडी सेविका ११, मदतनिस ५६, आष्टी अंगणवाडी सेविका २१, मदतनिस १३०, अंबाजोगाई अंगणवाडी सेविका ५, मदतनिस ४१, केज अंगणवाडी सेविका २७, मदतनिस ६२, परळी अंगणवाडी सेविका ६, मदतनिस ५, धारूर अंगणवाडी सेविका ७, मदतनिस २४ आणि वडवणी तालुक्यात अंगणवाडी मदतनिसच्या १७ जागा भरल्या जाणार आहेत.

### झेडपी जिल्ह्यात ६२० रिक्त पदे भरणार आज भरतीची जाहिरात होणार प्रसिध्द

### २४ फेब्रुवारीपासून दहा मार्चपर्यंत उमेदवारांना भरता येणार अर्ज

### भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडणार ; उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये सीईओ आदित्य जीवने कालिदास बडे यांचे आवाहन

## भरतीसाठी बारावीच्या शिक्षणाची अट

या भरतीसाठी बारावीच्या शिक्षणाची अट ठेवण्यात आलेली आहे. उमेदवाराचे जसे शिक्षण जास्त असेल तसे त्यांना या भरती प्रक्रियेत मोठा फायदाच होणार आहे.

बीड । दिव्य न्युज

येत्या काळात जिल्ह्यातील ६२० अंगणवाडीताईंच्या हाताला रोजगार मिळणार आहे. जिल्ह्यात जिल्हा परिषद महिला व बालविकास विभागाअंतर्गत अंगणवाडी सेविका आणि मदतनिस अशा ६२० रिक्त जागा भरणार आहे. त्याअनुषंगानेच आज दि. २० फेब्रुवारी रोजी नऊ तालुक्यातील जाहीरात प्रसिध्द करण्यात येणार आहे. तर २४ फेब्रुवारीपासून दहा मार्चपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज भरता येणार आहेत. ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन सीईओ आदित्य जिवने आणि महिला व बाल कल्याण विभागाचे कार्यक्रम अधिकारी कालिदास बडे यांनी केले आहे.

महिला व बालविकास विभागाअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस पदभरती बीड जिल्ह्यातील १३ एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत घेण्यात येणार आहे. वास्तविक पाहता जिल्ह्यात अंगणवाडी सेविका (१३६) व मदतनिस (४८४) अशा एकूण ६२० रिक्त पदांच्या भरतीसाठी शिरूर कासार आणि पाटोदा या प्रकल्पाने यापुर्वी दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीरात प्रसिध्द केलेली आहे. हे दोन प्रकल्प वगळून उर्वरित सर्व प्रकल्पांमध्ये आज दि. २० फेब्रुवारी रोजी सर्व प्रकल्प कार्यालयाकडून भरतीची जाहिरात प्रसिध्द होणार आहे. तसेच सदर रिक्त पदांसाठी अर्ज करण्याचा कालावधी २४ फेब्रुवारी २०२५ पासून दहा मार्च २०२५ हा कालावधी असणार आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने पात्र उमेदवाराने या पद्धरतीसाठी ईच्छूक उमेदवारांनी विहीत कालावधीत अर्ज संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे करावेत, ही भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पडणार आहे. त्यामुळे कोणत्याही उमेदवारांनी आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा परिषदेचे सीईओ आदित्य जिवने आणि महिला व बालविकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी कालिदास बडे यांनी केले आहे.

# शिवजन्मोत्सव रक्तदान करत साजरा दिंद्रुड च्या खोलेश्वर परिवाराचा आदर्श उपक्रम




दिंद्रुड । दिव्य न्युज : सय्यद अखिल

रक्ताचा तुटवडा भरून निघण्यासाठी खारीचा वाटा उचलत सलग पाचव्या वर्षीही शिवजन्मोत्सवाचा सण रक्तदान करून साजरा करण्याचा संकल्प दिंद्रुड येथील खोलेश्वर परिवाराने पूर्ण केला. बुधवारी छत्रपती शिवाजी महाराजांचा ३९५ व्या शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पारेकर यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या सरिता फपाळ, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, मुख्यकार्यकारी अधिकारी विलास पारेकर सह दिंद्रुड पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक या प्रसंगी उपस्थित होते. शिबिरात २०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पारेकर यांच्या संकल्पनेतून गेल्या पाच वर्षांपासून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन १९ फेब्रुवारीला करण्यात येते. परळी येथील वैद्यनाथ रक्त पेडी चे तंत्रज्ञ बिबीशन सांगळे,भाविका गाथे यांनी २०२ तरुण-तरुणींचे रक्तदान करवून घेतले. दिंद्रुड व पंचक्रोशीतील शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला. सर्व रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची रेखीव प्रतिमा व सहभाग प्रमाणपत्र याप्रसंगी देण्यात आले.खोलेश्वर परिवारातर्फे रक्तदात्यांना चहा व नाश्त्याची सोय करण्यात आली होती. खोलेश्वर मल्टीस्टेट मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पारेकर, खोलेश्वर मल्टीस्टेट मधील सर्व कर्मचारी आदी शिवभक्तांनी या रक्तदान शिबीरात अथक परिश्रम घेतले. शाळेच्या परिसरात केलेल्या गडकिल्ल्यांच्या देखाव्यामुळे परिसरातील वातावरण शिवमय झाले होते. दिंद्रुड येथील अशोक फरताडे यांनी हि माझी ६३ वी रक्तदान करण्याची वेळ असल्याचे सांगितले. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग खोलेश्वर परिवाराच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला ०५ महिलांनी रक्तदान केले.

# जिंतूरशहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून शिवजयंती उत्साहात साजरी

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी जिंतूर शहरात प्रतीवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा बहुजन प्रतीपालक, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९५ व्या जयंती निमित्य संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनाच्या वतीने विविध प्रकारच्या सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करून मोठ्या उत्साहाने छत्रपती शिवाजी महाराज यांची जंयती साजरी करण्यात आली.

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शहरातील मुख्य मार्गावर भगवे पताके लावण्यात आले होते तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोर विद्युत रोषणाई करण्यात आली होती व सकाळी ९ वाजता जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने शिवजन्माचा पाळना, प्रतीमा पुजन करून ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर अन्नाभाऊ साठे यांच्या चौकापासून जिंतूरचे तहसिलदार राजेश सरवदे, पोलीस निरीक्षक बुद्धीराज सुकाळे, जिंतूर नगरपरीषद चे शेख अजिज जानिमियाँ , नायब तहसिलदार प्रशांत राखे यांच्या हस्ते पुजन करून शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणूकीत आश्वारूढ बाळशिवाजीराजे, माँ साहेब जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज यांच्या वेषभुषेतील चिमुकल्या मुला, मुलीनी सर्वाचे लक्ष वेधून घेतले होते या मिरवणूकीत कस्तूरबा गांधी विदयालय व जवाहर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथक द्वारे विविध प्रकारचे सादरीकरण केले होते तसेच ढोल व ताशे वाजवत ही मिरवणूक अत्यंत शांततेत पार पडली असे आमचे प्रतिनिधी यांनी कळविले आहे



# जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी अॅड हरिहरराव आनंदराव देशमुख यांचे निधन



जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर शहरातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक व बारकॉन्सील चे उपध्यक्ष, श्री सिद्धेश्वर मंदिर संस्थेचे अध्यक्ष ड हरिहरराव आंनदराव देशमुख यांचे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी दुपारी परभणीच्या एका खाजगी रुग्णालयात निधन झाले होते त्यांचा अत्यसंस्कार आज दुपारी १२:३० वाजता त्याच्या शेतामध्ये करण्यात आला या वेळी हजारोच्या संख्येनं त्याचे चाहते उपस्थित होते त्यांना शासकीय मानवंदना देण्यासाठी तहसिलदार , पोलीस निरीक्षक, व त्याच्या टिम ने मानवंदना दिली व श्रद्धंजली अर्पण केली तसेच माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर , माजी आमदार गुलाबचंदजी राठी, झरीचे कांताराव देशमुख , माजी नगरअध्यक्ष वंसतराव शिंदे, माजी नगरअधक्ष सखाराम चिद्रवार , माजी नगराध्यक्ष डॉ पंडीतराव दराडे, सर्व नगरसेवक व्यापारी, शेतकरी अत्यंविधीला उपस्थित होते त्यांच्या पश्चात पत्नी चार मुली व दोन मुले असा परिवार होता जिंतूर चे माजी नगराध्यक्ष प्रतापरावजी देशमुख यांचे ते काका होते जेष्ठ स्वांतत्र्य सेनानी अॅड हरीहराव देशमुख याच्या निधनाने सर्वत हळहळ व्यक्त होत आहे.

# मिल्लीया महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा जय छत्रपती शिवाजी महाराज जय भारत पदयात्रेत सहभाग




बीड । दिव्य न्युज

दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मिल्लीया महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी बीड जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जय छत्रपती शिवाजी महाराज जय भारत पदयात्रेत सहभागी झाले होते. पदयात्रेचे उद्घाटन मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या हस्ते झाले. ही पदयात्रा जिल्हा स्टेडियम येथून सारडा नागरी, भाजी मंडई, बशीर गंज मार्गे छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम पर्यंत होती. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. शेख रफीक, डॉ. मिर्झा असद बेग यांनी पदयात्रा यशस्वी होण्याकरता परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांचे मार्गदर्शन लाभले.

# भव्य दिव्य सार्वजनिक शिवजयंती महोत्सव उत्साहात




दौलावडगाव । दिव्य न्युज :

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथे १९ फेब्रुवारी २०२५ रोजी वर्षे तिसरे भव्य सार्वजनिक शिवजयंती महोत्सव दौलावडगाव ग्रामपंचायत आणि जि.प.शाळा व खाजगी शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहाने जयंती साजरी करण्यात आली .या जयंतीचे खास वैशिष्ट्ये म्हणजे दौलावडगाव जिल्हा परिषद केंद्रीय शाळेअंतर्गत दौलावडगाव,मुळे वाडी, आनंदवाडी, फसले गोठे, सरस्वती विद्यालय,आडियल इंग्लिश स्कूल आणि दौलावडगाव अंतर्गत येणाऱ्या सर्व अंगणवाडीतील चिमुकल्या मुला-मुलीनी शिवजयंती महोत्सवात मोठा सहभाग नोंदविला. शाळेतील विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषा व केशभूषा करून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले यात प्रामुख्याने लेझीम,झांज पथक, ढोल ताशा पथक, काठी खेळ,बाल शिवबा देखावा,शिवगाथा, लोक गीते,भारूड अशा विविध प्रकारच्या कला सादर करून शिवप्रेमींची मने जिंकली.जयंतीच्या आदल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयावर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली.यातून दौलावडगाव ग्रामपंचायत तर्फे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी व त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा या उद्देशाने रोख रक्कम,प्रमाणात पत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक व अध्यक्ष सरपंच भरत जाधव तर या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित कृषी रत्न श्री बाबासाहेब पिसोरे आण्णा, मा. सभापती अशोक इथापे, अंभोरा पोलिस स्टेशनचे पो.कॉ.अमोल शिरसाट,पो.कॉ.भरत माने,ग्राम विकास अधिकारी भागवत अनारसे,स्पर्धक निवडण्यासाठी स्पर्धकांना गुण दान करण्याचे कार्य सिध्देश्वर ढोले आणि पत्रकार कासम शेख यांनी पाहिले.शिवजयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी आयोजक सरपंच, उपसरपंच,ग्राम पंचायत सदस्य, सर्व शाळेतील मुख्याध्यापक,सहशिक्षक,सहशिक्षिका, कर्मचारी वर्ग आदींनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन बाळासाहेब कोहक सर यांनी केले,जयंतीचे विशेष म्हणजे सर्व समाजातील लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन कार्यक्रमाला रंगत आणली. आलेल्या सर्व शिवप्रेमीना गावातील युवकांनी गोड जेवणाची व्यवस्था केली . यावेळी आदी मान्यवरांसह शिवप्रेमी,ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रशासनाला कारंजा टॉवरची दैनावस्था दुर करावीच लागेल!

## आता जनतेतही निर्माण झाली जागरूकता-एस.एम.युसूफ़, रमेश गंगाधरे

बीड । दिव्य न्युज

कारंजा टॉवर साठी आता जनताही सरसावली असून मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या निवेदनानंतर कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले. हे पाहून कारंजा, अजीजपुरा आणि खंदक भागातील अनेक नागरिकांनी सुद्धा जागरूकता दाखवत जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्याचे प्रसिद्धी माध्यमातून समोर आले आहे. यावरून ऐतिहासिक ठेवा असलेल्या कारंजा टॉवरला गतवैभव पुन्हा प्राप्त होणार असे कारंजा टॉवर च्या प्रश्नांविषयी लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, १४ फेब्रुवारी २०२५ रोजी कारंजा टॉवर विषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिल्यानंतर याविषयी १५ ते १९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत स्थानिक तसेच विभागीय वृत्तपत्रातून बातम्या प्रसिद्ध झाल्या. याचाच परिणाम म्हणून कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले आहे. हे पाहून कारंजा परिसरासह अजीजपुरा आणि खंदक येथील नागरिकांचाही हुरूप वाढल्याने त्यांनी एकत्रित येऊन कारंजा टॉवर विषयी जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषदेत निवेदन दिल्याचे प्रसिद्धी माध्यमातून समोर आले आहे. यामुळे कारंजा टॉवर विषयी आता सर्वसामान्य जनतेतही जागरूकता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे कारंजा टॉवरचा लढा आता खऱ्या अर्थाने जनतेने हातात घेतला असल्याचे दिसून येत आहे. जनरेटा वाढल्याने आता बीड नगरपालिकेसह जिल्हा प्रशासनालाही विशेष लक्ष देऊन कारंजा टॉवरची दैनावस्था दूर करावीच लागेल. जोपर्यंत कारंजा टॉवरचे नूतनीकरण परिपूर्ण होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही व लढा सुरूच ठेवणार असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

# ऑक्सीस हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

बीड । दिव्य न्युज

येथील डॉ.सय्यद अब्दुल हसीब (फेलोशीप इन आथ्रोस्कोपी) यांच्या ऑक्सीस हॉस्पीटलमध्ये हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या रविवार दि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक आर्थोपॅडीक हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे. सदरील शिबिर ऑक्सीस आर्थोपॅडीक हॉस्पीटल, अॅपेक्स टॉवर,माने कॉम्प्लेक्सच्या मागे नर्सरी रोड, बीड येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ७०२०५९०७८८ वर संपर्क करावा.



## २०१५ नंतर राज्य शासनाच्या नोकऱ्यांमध्ये १६ टक्क्यांनी घट; ख्रिश्चन, मुस्लीम, जैन धर्मीयांची संख्याही घटली

मुंबई । दिव्य न्युज

मागच्या काही दशकांपासून महाराष्ट्र राज्य शासनातील नोकरदारांची संख्या कमालीची घटली असून अल्पसंख्याक समुदायातील कर्मचाऱ्यांचीही संख्या रोडावली आहे. त्यामुळे नोकरवर्गातील वैविध्य कमी झाल्याचे सांगितले जात आहे. तर विविध सामाजिक घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आखलेल्या धोरणांमुळे २०१५ ते २०२३ या काळात आरक्षित गटातील कर्चमाऱ्यांची संख्या ६८.४ वरून वाढून ७१.१ टक्क्यावर पोहोचली आहे. तर ख्रिश्चन, मुस्लीम आणि जैन या अल्पसंख्याक समुदायातील कर्मचाऱ्यांची संख्या या काळात ४.७४ टक्क्यावरून ४.०८ टक्क्यावर आली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार २०१५ ते २०२३ या काळात महाराष्ट्र सरकारमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ५.७१ लाखांवरून कमी होऊन ४.७८ लाखावर आली आहे. राज्य सरकारच्या एकूण जागा ७.२४ लाख इतक्या आहेत. याचा अर्थ राज्य सरकारकडे सध्या ३४ टक्के जागा रिक्त आहेत. प्रति लाख लोकसंख्येमागे ५७० पदे मंजूर असताना सध्या



प्रति लाख लोकसंख्येमागे फक्त ३७७ कर्मचारी काम करत आहेत.

# ‘त्या’ शाळांच्या दर्जावर प्रश्न

## अल्पसंख्याक दर्जा देण्यात अनियमितता; मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना दिले चौकशीचे आदेश



अध्यक्षांची चौकशीची मागणी : राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी अल्पसंख्याक दर्जा असलेल्या शाळांमधील घोटाळ्यांकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून लक्ष वेधले आहे. याप्रकरणी चौकशीची मागणी त्यांनी केली आहे.

मुंबई । दिव्य न्युज

राज्यात काही शिक्षण संस्थांच्या शाळा, महाविद्यालयांना अल्पसंख्याक म्हणून मान्यता देताना झालेल्या कथित अनियमितांची चौकशी होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांना तसे आदेश दिल्याची खात्रीलायक माहिती आहे.

दारव्हा (जि.यवतमाळ) येथील जुन्या ट्रस्टच्या शाळेला भाषिक आधारावर अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय अल्पसंख्याक विभागाच्या एका अधिकाऱ्याने अलीकडेच घेतला होता. या शासन अनुदानित शिक्षण संस्थेचे सगळे संचालक मराठी भाषक असताना त्यांना हिंदी भाषक म्हणून अल्पसंख्याक दर्जा कसा दिला, असा सवाल मंत्री संजय राठोड यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मांडला. तेव्हा हा विषय गंभीर असून, या प्रकरणी चौकशी करा, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगेच सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यानंतर संबंधित शिक्षण संस्थेच्या शाळेला अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या आदेशाला स्थगिती देण्यात आल्याचीही माहिती सूत्रांनी दिली. अल्पसंख्याक विकास मंत्री दत्ता भरणे आहेत. शाळा, महाविद्यालयांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचे सक्षम प्राधिकारी असलेल्या अधिकाऱ्याकडून दोन आठवड्यांपूर्वी हे काम काढून एका महिला अधिकाऱ्याला ते दिले व त्यांनी दारव्हा येथील शिक्षण संस्थेबाबत आदेश दिला. मूळ विधान भवनचा अधिकारी असलेल्या मंत्री कार्यालयातील एका अनधिकृत व्यक्तीची यातील लुडबूड हा चर्चेचा विषय आहे.

### काय आहेत फायदे ?

अल्पसंख्याक संस्थांना आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास मुलामुलींना २५ टक्के प्रवेश देण्याची सक्ती नसते. राज्य सरकारच्या पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीबाबत नोंद करण्याची अटही त्यांना लागू होत नाही. तसेच, शिक्षक, कर्मचारी भरतीबाबत बिंदुनामावली लागू होत नाही. केलेल्या भरतीला स्थगितीही देता येत नाही. त्यामुळे अल्पसंख्याक दर्जा मिळविण्यासाठी अनेक संस्था प्रयत्नात असतात. त्यासाठी राजकीय दबाव आणि आर्थिक व्यवहारदेखील होतात अशी चर्चा होत आली आहे.

### सोलापूरच्या कन्नड शाळा मान्यता विषयाची किनार

सोलापूर जिल्ह्यातील काही शाळांनी कन्नड भाषिक म्हणून अल्पसंख्याक दर्जा मिळविला. मात्र त्यांनी बनावट कागदपत्रे जोडली असा आरोप आहे. या शाळांची अल्पसंख्याक म्हणून मान्यता रद्द करण्याची कार्यवाही एका अधिकाऱ्याने सुरू केली. मात्र, त्याच्याकडून सक्षम प्राधिकाऱ्याचा पदभार काढून घेण्यात आला, अशी माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली.

## स्व.द.बा.घुमरे तात्या जयंती बक्षीस वितरण थाटात संपन्न

पाटोदा / दिव्य न्युज

शिक्षक नेते द बा घुमरे तात्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक विपुल नानासाहेब मस्के चपावती विद्यालय याने ५१०० रु चे रोख पारितोषिक चषक मिळवून बाजी मारली तर द्वितीय क्रमांक आतार शोएब शोकत कालिकादेवी विद्यालय शिरूर याने रोख पारितोषिक ४१०० रु व ट्रॅफि देऊन गौरव करण्यात आला तृतीय क्रमांक तांबे नम्रता नानासाहेब चंपावती विद्यालय ३१०० रु रोख पारितोषिक व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला उत्तेजनार्थ बक्षीस शेख आलिया शेख नुर गोरक्षनाथ विद्यालय ढेकनमोह ११०० रु रोख व ट्रॉफी देऊन गौरव केला तसेच सटाले श्रावणी रवींद्र द बा घुमरे पब्लिक स्कूल बीड या विध्यार्थींनी बक्षीस मिळवले तर जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत प्रथम पारितोषिक आतार शोएब शोकत ५१०० रु रोख व स्मृती चिन्ह मिळवले तर द्वितीय पारितोषिक ३१०० रु व स्मृती चिन्ह शिंदे कृष्णा घुगे सुजल, खुरणे आदर्श वाघमारे शुभम कदम साईराज शाळा द बा घुमरे पब्लिक स्कूल तर तृतीय पारितोषिक शिंदे अथर्व तौर महेश शारदा विद्यामंदिर गेवराई यांनी २१०० रु व ट्रॉफी पटकवली तसेच उत्तेजनार्थ भामेश्वर विद्यालय चा विध्यार्थी नागरगोजे ओमराज खाडे शिवम यांनी ११०० रु रोख व चषक पारितोषिक पटकवले या स्पर्धेचे बक्षीस वितरण माजी मंत्री सुरेश नवले, मराठी शिलेदार संस्था नागपूर राहुल पाटील, संग्राम कुमठेकर, सी ए भानुदास जाधव, सुदाम शिंदे, विलासराव बडगे, भारत सातपुते कवी, गंगाधर कळकुटे, उत्तमराव पवार,मोहनराव शिरसाठ सुभाषराव पवळ समर्थ शिक्षण संस्था, गणेश वाघ, दीपक दादा घुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.



















हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०